# सूचना (NOTIFICATION)

## महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातील सरळसेवा भरती - २०२१

म्हाडा सरळसेवा भरती २०२१ करीता क्लस्टर-१,३ व ४ करीता दि.१२.१२.२०२१ रोजी ऑफ़लाईन पध्दतीने परीक्षा घेण्यात येणार होती. तथापि, दि.११.१२.२०२१ रोजी परीक्षा प्रक्रीया पार पाडण्याकरीता नेमणूक केलेल्या एजन्सीच्या संचालकांना पुणे सायबर पोलीसानी गोपनियतेचा भंग प्रकरणी अटक केल्याने दि.१२.१२.२०२१ रोजीची नियोजित परीक्षा ऐनवेळी रद्द करण्यात आली. म्हाडा सरळसेवा भरती प्रक्रिया पारदर्शी व सुरळीतपणे व्हावी तसेच पदभरती मध्ये गुणवत्ताधारक उमेदवारांवर कोणत्याही प्रकारचा अन्याय होऊ नये याकरीता परीक्षा ऐनवेळी रद्द करण्यात आली होती. तथापि, परीक्षा ऐनवेळी रद्द झाल्याने दि.१२.१२.२०२१ रोजी होणा-या नियोजित परीक्षेकरीता अर्ज केलेल्या उमेदवारांना झालेला त्रास विचारात घेऊन त्यांना परीक्षा शुल्क परतावा करण्यात येत आहे. उमेदवारांनी ज्या बँक खात्यामधून परीक्षा शुल्क भरणा केला आहे त्या खात्यावर पैसे जमा झाल्याबाबत खातरजमा करावी.

**सचिव**
**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण**